खरेदीखत

०४९५०/२००७
Dt - ३१/०५/०७

कोतकर मिरोडे
गट नं ४३
झाडगाव, नाशिक

Friday, June 01, 2007

10:16:32 AM

**Original**
नोंदणी 39 म.
Regn. 39 M

# पावती

पावती क्र. : 5127

गावाचे नाव आडगांव

दिनांक 01/06/2007

**दस्तऐवजाचा अनुक्रमांक** नसन1 - 04950 - 2007

दस्ता ऐवजाचा प्रकार अभिहस्तातंरणपत्र
(25-ब) पुढील हद्दीत असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असेल तर

सादर करणाराचे नाव:श्री.शामकांत केशव कोतकर

| | | |
|---|---|---|
| नोंदणी फी | :- | 30000.00 |
| नक्कल (अ. 11(1)), पृष्टांकनाची नक्कल (आ. 11(2)), रुजवात (अ. 12) व छायाचित्रण (अ. 13) -> एकत्रित फी (25) | :- | 500.00 |
| **एकूण** रु. | | 30500.00 |

आपणास हा दस्त अंदाजे 10:31AM ह्या वेळेस मिळेल

दुय्यम निंबधक
**सह. दुय्यम निबंधक वर्ग-२,**
**नाशिक-१.**

बाजार मुल्य: 2464133 रु. मोबदला: 4189192रु.
भरलेले मुद्रांक शुल्क: 209500 रु.

देयकाचा प्रकार :डीडी/धनाकर्षाद्वारे;
बँकेचे नाव व पत्ता: विश्वास को ऑप बँक लि. नाशिक;
डीडी/धनाकर्ष क्रमांक: 062111; रक्कम: 30000 रू.; दिनांक: 30/05/2007

नसन - १

# विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक

स्टॅम्प घेणाऱ्याचे नांव : श्री. श्रीमकांत केशव फोतकर

पत्ता : प्रभातरोड, पुणे

हस्ते : ॲड. शरद निवृत्ती गायधनी

रक्कम रु. : 209500 पावती क्र. : 30019

रुपये अक्षरी : दोन लाख नऊ हजार पाचशे मात्र

शाखाधिकारी

| | |
|---|---|
| आडगांव गट नंबर | ४३ |
| व्हॅल्युएशन झोन क्रमांक | ३.९३ |
| सरकारी व्हॅल्युएशन रुपये | २४,११,५००/- |
| खरेदीची किंमत रुपये | ४१,८९,१९२/- |
| स्टॅम्प रक्कम रुपये | २,०९,५००/- |
| नोंदणी फी रुपये | ३०,०००/- |

श्री

## कायम फरोक्त खरेदीखत

कायम फरोक्त खरेदीखत आज दिनांक ३१, माहे मे सन २००७, रोज गुरुवार ते दिवशी, नाशिक मुक्कामी.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★

नमुना - १
नं क्र. ४-५१० /२००७
२ — २५

२

| | |
|---|---|
| १) श्री. शामकांत केशव कोतकर,<br>वय ३८, व्यवसाय शेती व व्यापार,<br>रा. फ्लॅट नंबर १, स्वागत देवशांती,<br>प्रभात रोड, गल्ली नंबर १३, पुणे.<br>(PAN - ABEPK 3581 D)<br>२) श्री. गणेश निंबा शिरोडे,<br>वय ३७, व्यवसाय शेती व व्यापार,<br>रा. शिरुडे ऑटोमोबाईल्स, शिर्डी रोड, कोपरगांव, ता. कोपरगांव,<br>जि. अहमदनगर.<br>(PAN - ACMPS 2732 H)<br>दोघेही आज मुक्काम नाशिक. | लिहून घेणार |

-यांसी-

| | |
|---|---|
| १. श्री. सुभाषचंद्र भालचंद्र मुळे,<br>वय ६०, व्यवसाय सुखवस्तू,<br>रा. आशियाड सोसायटी, पंचवटी,<br>नाशिक ४२२ ००३.<br>(PAN- ABTPM 1451 D)<br>२. श्री. जयप्रकाश भालचंद्र मुळे,<br>वय ५५, व्यवसाय व्यापार,<br>रा. निंबाळकर वाडा, तिळभांडेश्वर लेन, नाशिक.<br>(PAN ) | लिहून देणार |

कारणे कायमचे खरेदीखत लिहून देतो ऐसा जे

की,-

१) या खरेदीखतात लिहून घेणार यांचा उल्लेख 'तुम्ही' अथवा 'लिहून घेणार' असा केला आहे. तसेच लिहून देणार यांचा उल्लेख 'आम्ही' अथवा 'लिहून देणार'

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★

नसतन-१

४९५०/२००७)

३ ---- २५



असा केला आहे. या सर्व संज्ञांमध्यें प्रत्येकाचे वंशवारस, असायनीज, एक्झिक्युटर्स, लिगल रिप्रेझेंटेटीव्ह, सक्सेसर या सर्वांचा समावेश आहे.

मौजे आडगांव येथील गट नंबर ४३ या पैकी १० आर क्षेत्राची जागा (११-९.२८ आर. क्षेत्र सामाईक रस्त्याचे हक्कासह) श्री. गणपत भिका मते यांचे पासून दिनांक ७/१/१९८९ रोजीच्या खरेदीखताने आम्ही खरेदी घेतली. ते खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांचे कचेरीत अ.नं. १०३ ने नोंदलेले आले आणि त्याप्रमाणे मिळकत आमचे मालकीची झाली. त्या शिवाय दिनांक ११ जून १९९० रोजीच्या खरेदीखताने पुन्हा गट नंबर ४३ या मिळकती पैकी १८ आर क्षेत्र अशी जागा आम्ही खरेदी केली. ते खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांचे कचेरीत अ.नं. ४०७७ ने नोंदलेले आहे. खरेदीखताध्यें असलेले क्षेत्र दुरुस्त करावे याबद्दलचा आदेश मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांचे कडून झाला. तो आदेश दिनांक ६/१२/१९९४ रोजीचा आहे. त्याप्रमाणे झालेल्या दोन्ही खरेदीखतांचा विचार करुन मिळकतीचे एकूण क्षेत्र किती आहे या बद्दलचा आदेश करण्यांत आला. आमचे खरेदीखताने खरेदी घेतलेल्या क्षेत्राच्या नोंदी आमचे नांवाच्या नोंद नंबर १८७१ व २०९२ ने झालेल्या असून रेकॉर्डची चुक

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1

नक्कल - १
४९५० /२००७)
४ २५

४

दुरुस्ती क्षेत्राबद्दलची नोंद नंबर २८६२, दिनांक १७/१/१९९४ ने झाली. त्याप्रमाणे या खरेदीखताचा विषय असलेले २९९२.२८ चौरस मीटर्स हे आमचे मालकीचे आहे. ते आमचे मालकीची मिळकतीचे क्षेत्र निश्चित आहे. त्याचा नकाशा आमचे खरेदीखतला जोडलेला असून या खरेदीखतास सुध्दा तो नकाशा जोडून दिलेला आहे.

सदरची मिळकत कै.गणपत भिका मते यांना वाटणी हक्काने मिळालेली होती व त्याबद्दल गांवचे हक्क पत्रकी नोंद नंबर ७३७ झाली होती. ती नोंद मे. तहसिलदार साहेब, नाशिक यांनी केलेला वाटपाबद्दलचा आदेश दिनांक १०/७/१९८४ केस नंबर ८७०/४८ नुसार आहे.

आमचे लाभांतील खरेदीखता पासून मिळकत आमचे प्रत्यक्ष कबजांत, वहिवाटीत व उपभोगांत स्वतंत्रपणे आहे. ७/१२ उता-यांत जरी नांवे एकत्रांत दिसत असली तर आमचे खरेदी मालकीच्या क्षेत्राचा कबजा आमचा स्वतंत्र आहे. सदरची मिळकत आमचे स्वकष्टार्जित व स्वसंपादीत आहे. सदर मिळकतीची पाहिजे तशी विक्री, विल्हेवाट करणेचा आम्हांस संपूर्णपणे हक्क व अधिकार आहे. त्यानुसार खालील वर्णन केलेली मिळकत आम्ही विक्री करण्याचे ठरविले आणि एजंट मार्फत खरेदीदार शोधण्यास सुरुवात केली. त्याची तुम्हांस माहिती झाली

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-1 *

नक्कल - १

दस्त क्र. ४९६५०/२००७

५ — २५

७

व तुम्ही खालील कलम २ यांत वर्णन केलेली मिळकत आमचे पासून खरेदी घेण्यात स्वारस्य दर्शविले. त्यानुसार तुमचे व आमचे दरम्यान चर्चा होवून व्यवहार निश्चित झाला. त्यानुसार प्रस्तुतचे खरेदीखत आम्ही तुमचे लाभांत लिहून दिले असून खालील कलम २ यांत वर्णन केलेल्या एकूण मिळकती पैकी आमचे मालकीची २९९२.५८ चौरस मीटर्स क्षेत्राची मिळकत तुम्हांस कायम फरोक्त खरेदी दिली आहे.

## २) मिळकतीचे वर्णन -

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी मौजे आडगांव या गांवचे शिवारातील, नाशिक महानगरपालिका हद्दीतील, नाशिक अर्बन एग्लोमोरेशन हद्दीबाहेरील स्थावर शेतजमीन मिळकत यांसी सर्व्हे नंबर ४३, यांसी क्षेत्र ०० हेक्टर ७० आर, अधिक पोट खराबा ०० हेक्टर ०१ आर, मिळून एकूण क्षेत्र ०० हेक्टर ७१ आर. यांसी आकार रुपये १.३० पैसे या एकूण मिळकती पैकी सोबतचे नकाशांत दर्शविल्याप्रमाणेचे २९९२.२८ चौरस मीटर्स क्षेत्राची मिळकत, या क्षेत्रास चतुःसीमा :-

पूर्वेस - नियोजित १८ मी रुंदीचा डी.पी. रोड व त्या पुढे गट नंबर ३६.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक

नसन-१
६ ४२७० /२००७
६ / २७

| | | |
|---|---|---|
| पश्चिमेस | - | सर्व्हे नंबर ४६ पैकी जागा व त्या पुढे सर्व्हे नंबर ४७९. |
| दक्षिणेस | - | याच गट नंबर ४३ पैकी लिहून देणार यांनी त्यांचे कडे ठेवलेले क्षेत्र वे पलिकडे गट नंबर ४४ व ४५ |
| उत्तरेस | - | गट नंबर ४२. |

येणेप्रमाणे चतुःसीमा पूर्वक मिळकत तदंगभूत वस्तुंसह, जाण्यायेण्याचे मार्ग, वहिवाटी मार्ग याचे हक्कासह, जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधी निक्षेपासह, जाण्यायेण्याचे असलेले मार्गासह तसेच वहिवाटी मार्गासह मिळकत दरोबस्त.

याप्रमाणे वरील कलम २ यांत वर्णन केलेली एकूण मिळकती पैकी २९९२.२८ चौरस मीटर्स क्षेत्राची मिळकत या खरेदीखताचा विषय असून या मिळकतीचा उल्लेख 'उपरोक्त मिळकत' अथवा 'सदरची मिळकत' असा केला आहे. या खरेदीखतासोबत मिळकतीचा नकाशा जोडलेला असून सदर नकाशामध्यें सदरचे २९९२.२८ चौरस मीटर्स क्षेत्र लाल रेषेने व 'अ-ब-क-ड' या अक्षरांनी दर्शवून दिले आहे. तो नकाशा या खरेदीखताचा एक भाग आहे. या क्षेत्रांत सामाईक रस्त्याचे क्षेत्राचा हिस्सेराशीने समावेश आहे.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक NASIK-1

३) उपरोक्त मिळकतीचे निर्वेधपणा विषयी खात्री करण्यासाठी तुम्ही ॲडव्होकेट श्री. प्रविण एस. अंतापूरकर

नक्कल - १
४८५८/२००७)
७ २५

यांचे मार्फत दिनांक ६/४/२००७ रोजीच्या दैनिक गांवकरी अंकांत जाहीर नोटीस प्रसिध्द केली. त्या जाहीर नोटीसीस आलेल्या हरकती व त्याचे निवारण याचा तपशील पुढील प्रमाणे -

१. श्री. मोहन बागमार यांनी ॲडव्होकेट श्री. सुबोध एम. शाह यांचे मार्फत हरकत दिनांक १८/४/२००७ रोजी घेतली व त्यांचे बरोबर आम्ही उपरोक्त मिळकती संबंधाने व्यवहार केला आहे अशी तक्रार उपस्थित केली. परंतू त्या नंतर त्यांचे व आमचे दरम्यान चर्चा होवून त्यांचा व्यवहार त्यांनी रद्द केला आहे. त्याबाबतचा कॅन्सलेशन डिडचा दस्तऐवज त्यांनी आमचे लाभांत लिहून दिला आहे. तो अस्सल दस्त तुमचे भोगवटयास दिलेला आहे.

२. श्री. रुंजा गणतप मते यांनी श्री. मनोज मुरलीधर बोढाई, ॲडव्होकेट यांचे मार्फत हरकत दिनांक १७/४/२००७ रोजी घेतली तसेच दिनांक १८/४/२००७ रोजीच्या दैनिक देशदूत मध्यें देखील जाहीर हरकत प्रसिध्द केली व उपरोक्त मिळकतीमधून त्यांची मालकीचे याचे गटातील क्षेत्रात जाण्यायेण्यासाठी सामाईक रस्ता आहे अशी तक्रार उपस्थित केली. त्यानंतर श्री. रुंजा मते व

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★

नक्कल - १
८
(८९५०/२००७)
८ — २५

आमचे दरम्यान आपसांत चर्चा होवून वादाचे निराकरण झाले व त्याबाबत समजुत झाली. त्यानुसार श्री. रुंजा मते यांनी त्यांची हरकत मागे घेतली असून त्याबाबचे पत्र श्री. रुंजा मते व त्यांचे वकिलांनी दिनांक ३०/४/२००७ रोजी दिले आहे. ते अस्सल पत्र तुमचे भोगवटयास दिले आहे.

याप्रमाणे जाहीर नोटीसीस आलेल्या हरकतीचे पूर्णपणे निवारण झाले असून आता उपरोक्त मिळकत संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची अशी तुम्हांस खरेदी दिली आहे. मिळकतीचे ७/१२ उता-यात इतर हक्कांत दर्शविलेले बोजे याचेशी आमचा व आमचे मालकीचे तुम्हांस खरेदी दिलेल्या क्षेत्राचा संबंध नाही. ते बोजे आमचे क्षेत्रबाबत नसून ते एकूण मिळकतीतील सह मालक यांचे क्षेत्रासंबंधाने आहेत, हे आम्ही तुम्हांस खात्रीने सांगून भरवशाने लिहून दिले आहे.

४) उपरोक्त मिळकत आम्ही तुम्हांस एकूण रक्कम रुपये ४१,८९,१९२/- (अक्षरी रुपये एक्केचाळीस लाख एकोणनव्वद हजार एकशे ब्याण्णव मात्र) या किंमतीस कायम फरोक्त खरेदी दिली आहे. ती किंमत बाजार भावाने योग्य व बरोबर असून त्याबाबत उभय पक्षी वाद अगर तक्रार नाही. सदर किंमतीचा भरणा या

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★

नमन - १

९ दस्त क्र. ४८५०/२००७)
२ - २५

खरेदीखतास जोडलेल्या परिशिष्ठ यांत नमूद केल्याप्रमाणे तुम्ही आम्ही नंबर १ व २ यांना दिला. तो भरणा आम्ही नंबर १ व २ या पावला, भरण्याबाबत वाद अगर तक्रार नाही. आता तुमचे पासून कुठलीही रक्कम घेणे शिल्लक नाही. मात्र परिशिष्ठांत नमूद केलेले चेक्स वटले नाही तर प्रस्तुतचे खरेदीखत रद्द होईल.

५) उपरोक्त मिळकतींचा प्रत्यक्ष व खुला कबजा आम्ही तुम्हांस आज रोजी दिला आहे व तो तुम्ही स्वतः हजर राहून घेतला आहे. कबजा बाबत वाद अगर तक्रार नाही. मिळकतीचा कबजा आम्ही तुम्हांस मालकीहक्काने कायमचा दिला आहे.

६) उपरोक्त मिळकत आम्ही तुम्हांस कायम फरोक्त खरेदी दिली आहे. आता सदर मिळकतीशी आमचा व आमचे वंशवारस, आमचे तर्फे हक्क सांगणारे इसम यांचा कुठलाही हक्क, हितसंबंध राहीलेला नाही. सदर मिळकतीचे तुम्हीच पूर्णपणे मालक झालेले आहांत. सदर मिळकतीचा उपभोग तुम्ही वंशपरंपरा, लेकराची लेकरी मनमानेल तसा निरंतर घ्यावा अगर तुम्हांस पाहिजे तशी सदर मिळकतीची विक्री, विल्हेवाट करावी. तुमचे कबजांस, वहिवाटीस, उपभोगांस, मालकीहक्कास आम्ही अथवा आमचे तर्फे कोणीही हिल्ला हरकत करणार नाही. अशी कुठलीही हरकत आल्यास त्याचे निवारण

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

नसन-१
१० | नाशिक-१ ४९५०/२००७
१० — २५

आम्ही व आमचे पश्चात आमचे वारस स्वखर्चाने करुन देवू. त्याची तोषीस तुम्हास लागू देणार नाही. त्याची तोषीस तुम्हांस लागू देणार नाही.

७) सदर मिळकत पूर्व बाजूने उत्तर-दक्षिण १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होते असा उल्लेख नाशिक महानगरपालिकेचे झोनिंग दाखल्यामध्यें केलेला आहे. याप्रमाणे रस्त्याकडे जे काही क्षेत्र जाईल त्याची मिळणारी नुकसान भरपाई रक्कम अगर एफ.एस.आय. अशा ज्या स्वरुपांत मिळेल ती तुमचे तुम्ही घेणेची आहे. त्याचेशी आमचा संबंध नाही. आम्ही या पूर्वी कुठल्याही प्रकारे नुकसान भरपाई घेतलेली नाही.

८) उपरोक्त मिळकत संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे. आम्ही जाहीर व कबूल करतो की, सदर मिळकतीवर गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, तारण, बक्षीस, मृत्यूपत्र, जप्ती, जामीनकी, कोर्ट वाद, हद्दीचा वाद असा अगर अन्य कुठलाही बोजा नाही. मिळकतीत आमचे व्यतिरिक्त अन्य कोणीही हिस्सेदार, मालक नाही. मिळकतीचे आमचे लाभांतील खरेदीखताचे झालेल्या नोंदी बाबत अगर अन्य कुठलाही नोंदी बाबत कोणीही वाद केलेला नाही. मिळकतीत आमचे व्यतिरिक्त अन्य कोणीही आपला हक्क, हितसंबंध, मालकी सांगत

SEAL OF JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

नसन-१
४८७३/२००७
११ २८

नाही. मिळकत ॲक्वायर, रिझर्व्ह, रेक्वीझीशन झालेली नाही अगर तशी कुठलीही नोटीस आज पावेतो आम्हांस आलेली नाही. मिळकती मधून अन्य कोणासही इज्जमेंटचा हक्क नाही. मिळकतीत कुळ नव्हता व नाही व मिळकत विक्री संबंधी मुंबई कुळ कायद्यान्वये कोणतेही निर्बन्ध नाहीत. तसेच सदर मिळकत आदीवासींची नव्हती व नाही. तसेच सदर मिळकत इनामी नव्हती व नाही. सदर मिळकतीचे वापरासंबंधी कोणतेही निर्बन्ध नाहीत. सदरची मिळकत कोणत्याही कायद्यान्वये अतिरिक्त जाहीर झालेली नाही. सदर मिळकती संबंधी आम्ही अन्य कोणाही बरोबर करार मदार केलेला नाही. सदर मिळकती संबंधाने कोणत्याही कोर्टात दावा न्यायप्रविष्ठ नाही अगर मिळकत विक्री करु नये असा कोणत्याही कोर्टाचा मनाई हुकूम नाही. अशा प्रकारे सदर मिळकत संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे हे आम्ही तुम्हांस खात्रीने सांगून भरवशाने लिहून दिले आहे. तथापि मिळकतीवर कुठलाही बोजा आढळून आल्यास अगर आमचे मालकीहक्का बाबत, कबजा बाबत, हद्दी बाबत, नोंदीबाबत अगर अन्य कुठल्याही कारणास्तव वाद उपस्थित झाल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदर खर्चाने करुन देवू. त्याची तोषीस तुम्हांस लागू देणार नाही.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

नसन - १
१२ ४२७८/२००७
१२ २९

९) उपरोक्त मिळकतीचे निर्वेधपणा विषयी खात्री करण्यासाठी तुम्ही वर नमूद केल्याप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिध्द केली होती. त्या जाहीर नोटीसीस आलेल्या हरकतीचे निवारण वर नमूद केल्याप्रमाणे आम्ही करुन दिले आहे. त्या व्यतिरिक्त सदर नोटीस कोणाच्याही कुठल्याही हरकती आलेल्या नाहीत. तथापि येथून पुढे कोणाच्याही कुठल्याही हरकती आल्यास अगर मिळकतीवर अन्य कोणीही आपला हक्क, हितसंबंध सांगून वाद उपस्थित केल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदर खर्चाने करुन देवू. त्याची तोषीस तुम्हांस लागू देणार नाही.

१०) सदरची मिळकत आज मित्तीस रहिवासी विभागांत समाविष्ठ आहे. त्याबाबतचा दाखला नाशिक महागनरपालिका नाशिक यांनी त्यांचे कडील पत्र जा.नं. नामपा/न.र./झोन दाखला/पंच./१९३, दिनांक २६/४/२००७ अन्वये दिला आहे. परंतू मिळकत जरी रहिवासी विभागात असली तरी प्रत्यक्षांत मिळकत अजून बिनशेती कडे वर्ग झालेली नसल्यामुळे उपरोक्त मिळकत आज शेतजमीन म्हणून तुम्हांस खरेदी दिली आहे. तुम्ही स्वतः शेतकरी आहांत. त्याबाबतचा ७/१२ उतारा सोबत जोडला आहे. सबब तुम्हांस सदर मिळकत खरेदी घेता येते. त्यासाठी मुंबई कुळ कायदा कलम ६३ प्रमाणे परवानगी घेण्याची

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१, वर्ग

आवश्यकता नाही. तसेच सदर खरेदीखतास ना-हरकत दाखला नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी त्यांचे कडील पत्र जा.नं. नरवि/वशि/पंच./१९३/१/२००७, दिनांक २६/४/२००७ अन्वये दिला आहे. तसेच सदरची मिळकत नागरी जमीन कमाल मर्यादा कायद्याचे नाशिक नागरी समुहाचे बाहेर आहे. त्याबाबतचा दाखला मे. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,नाजकम नाशिक यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्र.नाजकम/सी-१/२९५८/२००७, दि. २७/४/२००७ अन्वये दिला आहे. याप्रमाणे खरेदीखतासाठी आवश्यक ती सर्व पूर्तता करण्यांत आली आहे.

११) सदर खरेदीखताचा संपूर्ण खर्च स्टॅम्प, लिहीणावळ, नोंदणावळ वगैरे सर्व तुमचे तुम्ही केला व सोसला आहे.

१२) सदरची मिळकत आम्ही तुम्हांस कायम फरोक्त खरेदी दिली असून ती उलट खरेदीची लेखी अथवा तोंडी बोली नाही. प्रस्तुतचे खरेदीखत आमचेवर, आमचे वालीवारसांवर व आमचे तर्फे हक्क सांगणारे इसम या सर्वांवर बंधनकारक आहे व राहील.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

१३) या खरेदीखतानुसार तुम्हांस खरेदी दिलेल्या मिळकतीला रेव्हेन्यू रेकॉर्डला तुम्ही तुमचे नांव लावून

नसन-१
१४ ४९५०/२००७)
१४ १५

घ्यावे. त्यासाठी आम्ही अर्ज करुन दिला आहे. तसेच तुम्हांस खरेदी दिलेल्या क्षेत्राचा ७/१२ उतारा अलग, तुटक होत असल्यास अलग, तुटक व स्वतंत्र करुन घ्यावा. त्यासही आमची संमती आहे.

१४) तुम्हांस खरेदी दिलेल्या उपरोक्त मिळकती वरील शेतसारा आज पावेतोचा आम्ही भरुन दिला आहे. येथून पुढील सर्व शेतसारा तुम्ही मालक म्हणून भरुन द्यावा.

१५) या खरेदीखतासोबत तुमचे भोगवट्यास दिलेले कागदपत्र पुढील प्रमाणे.

१. ७/१२ उतारा.
२. नोंदीचे उतारे.
३. खाते उतारा
४. मिळकतीचा नकाशा.
५. आमचे लाभांतील दोन्ही अस्सल खरेदीखते.
६. मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांचा क्षेत्र दुरुस्ती बाबतचे आदेशाची नक्कल.
७. मिळकत शेती झोन मध्यें असल्याचा दाखला.
८. खरेदीखतासाठी नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे कडील ना-हरकत दाखला.
९. मिळकत सिलींग हद्दीबाहेर असल्याचा दाखला.
१०. श्री. बागमार यांची हरकत रद्द केल्याचा लेख.
११. श्री. रुंजा मते यांची हरकत रद्द केल्याचा लेख.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

१६) उपरोक्त मिळकत तुम्ही नंबर १ यांनी ७५ टक्के व तुम्ही नंबर २ यांनी २५ टक्के अशा अविभक्त

१७

नसन - १
दस्त क्र. ७९५० / २००७
१५ २५

हिस्सेराशीने खरेदी घेतली आहे. सबब तुम्ही नंबर १ यांना ७५ टक्के व तुम्ही नंबर २ यांना २५ टक्के अशा मालकीहक्काने उपरोक्त मिळकत खरेदी दिली आहे. परिशिष्ठांत नमूद केलेला भरणा तुम्ही नंबर १ यांनी संपूर्णपणे दिला आहे. तरी हिस्सेराशीने तुमच्या सांगण्यावरुन नमूद केली आहे.

येणेप्रमाणे कायम फरोक्त खरेदीखत आज रोजी राजीखुशीने व स्वसंतोषाने लिहून दिल असे.ता.म.

लिहून देणार-

१. श्री. सुभाषचंद्र भालचंद्र मुळे ------------------------

२.श्री. जयप्रकाश भालचंद्र मुळे ------------------------

लिहून घेणार-

१) श्री. शामकांत केशव कोतकर------------------------

२) श्री. गणेश निंबा शिरोडे ------------------------

JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1

साक्षीदार-

१.------------------------
(मनोज केशव कोतकर)

२.------------------------
Rajesh Anand

नक्कल - १

दस्त क्र. ४८७० /२००७

परिशिष्ठ १८ — २७

वरील कलम ३ यांत नमूद केल्याप्रमाणे मिळकतीची एकूण किंमत रुपये ४१,८९,१९२/- अक्षरी रुपये एक्केचाळीस लाख एकोणनव्वद हजार एकशे ब्याण्णव मात्र चा भरणा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालील प्रमाणे दिला. त्याचा तपशील असा की,

| अ. नं. | चेक घेणार | चेक नंबर | चेक दिनांक | चेक रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाषचंद्र मुळे | १५८५७१ | ४/५/२००७ | १०,९४,५९६/- |
| २ | सुभाषचंद्र मुळे | १५८५७३ | २१/६/२००७ | ५,००,०००/- |
| ३ | सुभाषचंद्र मुळे | १५८५७५ | ७/७/२००७ | ५,००,०००/- |
| ४ | जयप्रकाश मुळे | १५८५७२ | ४/५/२००७ | १०,९४,५९६/- |
| ५ | जयप्रकाश मुळे | १५८५७४ | २१/६/२००७ | ५,००,०००/- |
| ६ | जयप्रकाश मुळे | १५८५७६ | ७/७/२००७ | ५,००,०००/- |
| | | | | ४१,८९,१९२/- |

वरील सर्व चेक्स बॅन्क ऑफ महाराष्ट्र, शाखा एरंडवणा, पुणे या बॅन्केवरील आहे.

याप्रमाणे एकूण किंमत रक्कम रुपये ४१,८९,१९२/- अक्षरी रुपये एक्केचाळीस लाख एकोणनव्वद हजार एकशे ब्याण्णव मात्र चा भरणा आम्हांस वरील प्रमाणे चेक्स अन्वये मिळाला, तो भरणा आम्हां उभयतांस पावला, भरण्याबाबत वाद अगर तक्रार नाही. आता तुमचे पासून कुठलीही रक्कम घेणे शिल्लक नाही.

लिहून देणार/भरणा घेणार

१. श्री. सुभाषचंद्र भालचंद्र मुळे ----------------

२. श्री. जयप्रकाश भालचंद्र मुळे ----------------

JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१
सत्यमेव जयते

नक्कल करिता

गांव **आडगांव**

**गां. न. नं. ७, ७अ, व १२**

**ता. जि. नाशिक**

| भूमापन क्रमांक | हि.क्र. | धारणा प्रकार | गां. नं. क्र. ७ | खाते क्रमांक ४० १७६, १९००, १९९३ |
|---|---|---|---|---|
| | — | वर्ग-१ | **भोगवटदाराचे नाव** | |
| भूमापनाचे नाव | — | | (९) (७३७) (१३४४) (२९९२) (१९०५) | कुळाचे नाव |
| लागवड योग्य क्षेत्र | ~~एकर~~ हेक्टर ~~चौरस~~ | ~~गुंठे~~ आर ~~मिटर~~ | (२०९२) अरुण मुरलीधर बोराडे क्षेत्र ०=१० आ ०=२० (९९२२) (१९०५) | इतर अधिकार (९) (१३४४) मुदत एक वर्षाने बि. शो. उपयोग करून करावा. क्षेत्र ०=१० |
| | ०=६० | | सुभाषचंद्र मालचंद्र मुथे जयप्रकाश मालचंद्र मुथे | |
| एकूण- | ०=६० | | क्षेत्र २०९२=२८ पैकी आ ०=३० पैसे (२०९२) | दि नाशिक मर्चंन्ट को ऑ बँक लि. नाशिक गाहाण रु १,९०,५००/- उपसंख्या अरुण मुरलीधर बोराडे यांचा हिस्सा (२०९२) |
| | ०=७९ | | यमुनाबाई भ्र गणपत मते रंजा गणपत मते फुल्याबाई बाप गणपत मते | आडगांव वि. का. स. सो. ची हिस्से रु ५००००/- रंजा गणपत मते |
| एकूण- | ०=७९ | | मेल्याबाई भ्र बाबुराव हिले गीताबाई भ्र पंढरीनाथ हिले | १५९९/२००१ यांचे फाळणी बोजा. (६००९) |
| सर्वसाधारण आकारणी- | रूपये | पैसे | सत्यभामाबाई भ्र कचरु बोराडे | + ५०००००/- रंजा गणपत मते |
| विशेष - | ९=३० | | क्षेत्र ३०० ७-७२ पैकी (३७६८) आ . ०=८० पैसे. | आडगांव. वि. का. स. सो. चे हिस्से |
| जुडी किंवा नुकसानी बाबत- | | | | |
| एकूण- | ९=३० | | सौ सुवर्णा प्रकाश बोराडे महेन्द्र माधव आवारे ० हे १० आर आ ०=२० (९९२२) | रु ८०००/- खवघन्टे हाऊस मंडप हिस्से इतर मुक्त जालाना रंजा गणपत मते |

(नमुना-१, खंड, दस्त क्र. ४०५१० / २००७, पृष्ठ १५ — २५)

गां.नं. क्र. ७ अ | गां.नं. क्र. १२

| जमीन कसणाऱ्याचे नांव | रीत | हंगाम | पिकाखालील क्षेत्र: मिश्र पिकांचे एकूण क्षेत्र: मि. पी. संकेतांक | जलसिंचित | अजलसिंचित | मिश्र पिकातील प्रत्येक पिकाचे क्षेत्र: पिकाचे नांव | जलसिंचित | अजलसिंचित | अ मिश्र पिकाचे क्षेत्र: पिकाचे नांव | जलसिंचित | अजलसिंचित | पडीत पिकास निरूपयोगी जमिनीचा तपशील: प्रकार | क्षेत्र | पाणी पुरवठ्याचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| रंजा गणपत मते | | | | | | हायब्रीड ०-३०-७२ | | | | | | | | | |
| सुवर्णा, बोराडे | | | | | | पडीत ०-१० | | | | | | | | | |
| सुभाष मालचंद्र मुथे व ९ | | | | | | पडीत ०-२९-२२८ | | | | | | | | | |

JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1

तलाठी आडगांव
ता. जि. नाशिक

प्रमाणे खरी नक्कल तयार ता. 5 APR 2007

...यालय,
...बुधवार पेठ, गणपती चौक,
... फोन : २४४५६६७६

# गा. न. क्र. ७, ७ अ, व १२

शिक्का

...खडकवासला ता. हवेली जि. पुणे

| ...न क्रमांक / ... नं. गट क्रमांक | हि.क्र. | धारणा प्रकार | गा.नं.क्र.७ | खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| ६० | १ई | | मालकाचे नांव | कुळाचे नांव |
| ...न क्रमांकाचे ...क नांव | | | वसंत रंगनाथ पारगे<br>विठ्ठल रंगनाथ पारगे<br>रमेश रंगनाथ पारगे (२५२६) | इतर अधिकार / हक्क / सविस्तर |
| ...ड योग्य क्षेत्र | हेक्टर | आर | | |
| ...त | | | | |
| ...इत | ३ | १५ | (१) राजेश रमेश गुंदेचा<br>(२) सरिता नरेंद्र संचेती<br>(३) विपुल व्यानजीभाई सिरोया (३१८६) | नमुना - १<br>दस्त क्र. (७८५० /२०००)<br>१८ - २५ |
| ... शेती | | | | |
| ... | ३ | १५ | | |
| ... ड... | | | | |
| ... अ)... | | | | |
| ... ब)... | | | | |
| ... | ३ | १५ | १) प्रभाकर दत्तात्रय गवळी<br>२) निरज जयंत कोंगेरिया<br>३) रणजीत कुलानी जिम्हण<br>४) शामकांत केशव कोतवाल<br>न. १ ते ४ भागीदार फॉरेस्ट हिल्स डेव्हलपर्स (३२६१) | |
| ... | रुपये | पैसे | | |
| ... अथवा विशेष ... पाण्याबाबत... | १७ | ५० | | |
| एकूण | १७ | ५० | | |

| गा. न. क्र. ७ अ | | गा. न. क्र. १२ | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पीकाखाली क्षेत्र | | | | | | | | | पडीक व पीकरस निरुपयोगी अशा जमिनीचा तपशील | | | |
| | | | | मिश्र पीकाचे एकूण क्षेत्र | | | मिश्र पीकातील प्रत्येक पीकाचे क्षेत्र | | | अमिश्र पीकाचे क्षेत्र | | | | | | |
| वर्ष | ...चे नाव | रीत | हंगाम खरीप रब्बी | मिश्र पि. संकेतांक | जलसिंचीत | अजलसिंचीत | पीकाचे नांव | जलसिंचित | अजलसिंचित | पीकाचे नांव | जलसिंचित | अजलसिंचित | प्रकार | क्षेत्र | पाणी पुरवठ्याचे साधन | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| ...०५ | | | रब्बी | | | ज्वारी | २-०० | गवत | १-१५ | | | | | | | |
| ...०६ | | | रब्बी | | | ज्वारी | २-०० | गवत | १-१५ | | | | | | | |

THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ... NASIK-1

मुळ ...बरहुकुम नक्कल दिला. तारीख ३०/५/०६ गावकामगार तलाठी सही

तलाठी खडकवासला
ता. हवेली जि. पुणे

नमुना - १
७८५० / (२००७)
१२ — २५

नक्कल करिता

गांव निमगांव (नमगाव)
तालुका (सिन्नर)

## गां. न. नं. ७, ७अ, व १२

| भूमापन क्रमांक | हि.क्र. | धारणा प्रकार | गां. नं. क्र. ७ | खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ४०२ | १ | भो.१ | भोगवटदाराचे नाव (८२०) गणेश निवृत्ती शिरोडे | कुळाचे नांव खंड |
| दु.का.क्रमांकाचे स्थानिक नाव | — | | | गा.नं.४०२/३ चे वि.पा. बँक ऑफ बडोदा शाखा ...पर्यंत मध्ये कर्ज रु. ५०००००/- (१०/१/२००७) |
| लागवडी योग्य क्षेत्र | ~~एकर~~ हेक्टर ~~चौरस~~ | ~~गुंठे~~ आर ~~मिटर~~ | | इतर अधिकार |
| जिरायत - | १- | २० | | |
| बागायत - | | | | |
| भात शेती - | | | | |
| एकूण- | १- | २० | | |
| पो.ख. - | | | | |
| वर्ग (अ) - | — | — | | |
| " (ब) - | | | | |
| एकूण- | १- | ०० | | |
| आकार बिनशेती- | रूपये ३ - | पैसे ७६ | | |
| जुडी किंवा विशेष - | | | | |
| आकार पाण्याबाबत- | | | | |
| एकूण- | ३ - | ७६ | | |

गां.नं. क्र. ७ अ / गां.नं. क्र. १२

| वर्ष | जमीन कसणाऱ्याचे नांव | रीत | हंगाम | पिकाखालील क्षेत्रांचा तपशिल: मिश्र पिकांचे एकूण क्षेत्र: मि.पी. संकेतांक | जलसिंचित | अजलसिंचित | मिश्र पिकातील प्रत्येक पिकाचे क्षेत्र: पिकाचे नांव | जलसिंचित | अजलसिंचित | अ मिश्र पिकाचे क्षेत्र: पिकाचे नांव | जलसिंचित | अजलसिंचित | पडीत पिकास निरूपयोगी जमिनीचा तपशील: प्रकार | क्षेत्र | पाणी पुरवठ्याचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| २००६ २००७ | [illegible] | | | | कांदा १-२० | | | | | | | | | | | गा.नं.४० मधील वि... |

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★

नक्कल फी —

अस्सल प्रमाणेबरहुकूम खरी नक्कल तयार ता. 15 MAY 2007

तलाठी
श्री.ए.जे.बावस्कर
तलाठी सजा-निमगांव म.

29 May 2007 18:26 HP LASERJET FAX 02423221974 p.1
Received Fax : 29 May 2007 18:17 Fax Station : p. 1

# नाशिक महानगरपालिका कार्यालय, नाशिक

जा. नं. : नामपा / न.र. / झोन दाखला / ५५/१६३

दिनांक : २६/०४/२००७

प्रति,

श्री. / ~~श्रीमती~~ सुभाषचंद्र भालचंद्र मुळे व इतर.

आडगांव

नाशिक.

नसल - १
१२९० /२००७
२०  २५

**विषय : झोनिंग दाखला मिळणेबाबत.**

**संदर्भ : आपला दिनांक २६/०४/ २००७. चा अर्ज.**

महोदय / महोदया, (डि.पी. शिट नं. ११)

१) नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे आडगांव शिवारातील ~~सि. स. नं.~~ / ~~स. नं.~~ / गट नं. ४३ - ~~मधील अंतिम भूखंड क्रमांक~~ — ~~नगररचना योजना नाशिक क्र. १/२~~ ही जमीन नाशिक महानगरपालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार —

सदर जमिन शेतीवाडी विभागात समाविष्ट असुन पुर्व बाजु उत्तर-दक्षिण १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होते.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-1
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

~~सहाय्यक~~ नगररचना ( करिता )

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, पोस्ट बॉक्स नं. १२, नाशिक – ४२२ ००२.

Visit us at : www.nashikcorporation.com ● E-mail : eeplanning@dataone.in

नगररचना विभाग
जा.नं./नरवि/वशि/पंच /९६३/१ /२००७.
दिनांक: २६/ ०४ /२००७.

| |
|---|
| नमुना – १ |
| दस्त ४८१० /२००७ |
| २९ २४ |

प्रति,
श्री. सुभाषचंद्र भालचंद्र मुळेवडकर.
आडगांव, नाशिक.

विषय:- खरेदी-विक्रीसाठी नाहरकत दाखला मिळणेबाबत..

संदर्भ:- आपला दि.२६/०४/२००७ चा अर्ज..

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये दाखला देण्यात येतो की, नाशिक महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेच्या आराखडयात मौजे --आडगांव-- शिवारातील गट नंबर ---४३--- ही जमिन रहिवासी विभागात समाविष्ट असून पूर्व बाजू १८.० मी. रुंद विकास रस्त्याने बाधित होते.

तरी गट नंबर ---४३--- च्या ७/१२ उता-यावरील क्षेत्राच्या सर्व कायदेशिर बाबींची आपल्या स्तरावर पुर्तता करुन खरेदी-विक्री करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

कार्यकारी अभियंता
नगररचना विभाग
नाशिक महानगरपालिका,नाशिक

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class 2 NASIK
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२

FOR AMOUNT BELOW RS.

DATE : 30/05/2007

ON DEMAND PAY JOINT SUB REGISTRAR CLASS II NASIK ********** OR ORDER

THIRTY THOUSAND ONLY

FOR VALUE RECEIVED Rs. *****30000.

| एह OT | दह TT | एला OL | दला TL |
|---|---|---|---|

For VISHWAS CO-OPERATIVE BANK LIMITED

विश्वास को-ऑप. बँक लि.,नाशिक
VISHWAS CO-OP. BANK LTD., NASHIK
H. P. T. College Road, Branch, Swapnavaibhav, Adwait Colony, Canada Corner, College Road, Nashik 422 005. (Maharashtra) Telefax : (0253) 2305613.

Authorised Signature    Authorised Signature

VALID FOR SIX MONTHS FROM THE DATE OF ISSUE

HPC

1 2 3 4 5 6 7 8 9

⑈062111⑈ 422504005⑆ 12

क्रं. नाजकम/सी-१/२९५४/२००७,
अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
ना.ज.क.म. नाशिक यांचे कार्यालय
नाशिक दि.२८/ ४/२००७

प्रति,

श्री./श्रीमती.-------

विषय :- नागरी जमिन कमाल धारंणा मर्यादा १९७६ नाशिक नागरी समुहाचे क्षेत्राबाबतचा दाखला.

मौजे ता.

आपला दि.२६/४/०८ च्या अर्जा संदर्भात कळविण्यात येते की,
मौजे ता. जि. नाशिक येथिल स.नं./गट नं. ८२, ८३
प्लॉट नं. नाशिक नागरी समुह कक्षेच्या आहे.


स.ने.र.

(मंजुर टिपणी नुसार) अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
नाजकम नाशिक

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-1 *

मौजे – आडगाव
ता. – नाशिक
जि. – नाशिक

| नमुना – १ |
| --- |
| दस्त (४९५० / २००७) |
| 23 – 25 |





SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2
दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१
★ NASIK-1 ★

प्रमाण – १ = १०००
मोजणी तारीख = 23-8-2008

| | | | |
|---|---|---|---|
| ..06/2007 | दुय्यम निबंधकः | **दस्त गोषवारा भाग-1** | नसन1 |
| ..19:43 am | नाशिक 1 | | दस्त क्र 4950/2007 |
| | | | 28/29 |

दस्त क्रमांक : 4950/2007

दस्ताचा प्रकार : अभिहस्तांतरणपत्र

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | पक्षकाराचा प्रकार | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नावः श्री.शामकांत केशव कोतकर<br>पत्ता: घर/फ़्लॅट नं: 1<br>गल्ली/रस्ता: प्रभात रोड<br>ईमारतीचे नावः स्वागत देवशांती<br>ईमारत नं: -<br>पेठ/वसाहत: गल्ली नं.13, पुणे<br>शहर/गाव:पुणे<br>तालुका: -<br>पिन: -<br>पॅन नम्बर: | लिहून घेणार<br>वय 38<br>सही |  |  |
| 2 | नावः श्री.गणेश निंबा शिरोडे<br>पत्ता: घर/फ़्लॅट नं: -<br>गल्ली/रस्ता: -<br>ईमारतीचे नावः -<br>ईमारत नं: -<br>पेठ/वसाहत: शिर्डी ता.कोपरगांव<br>शहर/गाव: जि.अहमदनगर<br>तालुका: -<br>पिन: -<br>पॅन नम्बर: अेसीएमपीएस2732एच | लिहून घेणार<br>वय 37<br>सही |  |  |
| 3 | नावः सुभाषचंद्र भालचंद्र मुळे<br>पत्ता: घर/फ़्लॅट नं: -<br>गल्ली/रस्ता: -<br>ईमारतीचे नावः आशियाड सोसा.<br>ईमारत नं: -<br>पेठ/वसाहत: पंचवटी<br>शहर/गाव:नाशिक<br>तालुका: नाशिक<br>पिन: -<br>पॅन नम्बर: अेबीटीपीएम1451 | लिहून देणार<br>वय 60<br>सही |  |  |
| 4 | नावः जयप्रकाश भालचंद्र मुळे<br>पत्ता: घर/फ़्लॅट नं: -<br>गल्ली/रस्ता: -<br>ईमारतीचे नावः निंबाळकर वाडा<br>ईमारत नं: -<br>पेठ/वसाहत: तिळभांडेश्वर लेन<br>शहर/गाव:नाशिक<br>तालुका: नाशिक<br>पिन: -<br>पॅन नम्बर: - | लिहून देणार<br>वय 55<br>सही |  |  |

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★
दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

दस्तऐवज करुन देणार तथाकथीत [अभिहस्तांतरणपत्र] दस्तऐवज करुन दिल्याचे कबूल करतात.

## दस्त गोषवारा भाग - 2

नसन1

दस्त क्रमांक (4950/2007)

२५/२५

दस्त क्र. [नसन1-4950-2007] चा गोषवारा

बाजार मुल्य :2464133 मोबदला 4189192 भरलेले मुद्रांक शुल्क : 209500

दस्त हजर केल्याचा दिनांक :01/06/2007 10:11 AM

निष्पादनाचा दिनांक : 31/05/2007

दस्त हजर करणा-याची सही :

दस्ताचा प्रकार :25) अभिहस्तांतरणपत्र

दस्त अनुच्छेद प्रकार: (25-ब) पुढील हद्दीत असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असेल तर

शिक्का क्र. 1 ची वेळ : (सादरीकरण) 01/06/2007 10:11 AM

शिक्का क्र. 2 ची वेळ : (फ़ी) 01/06/2007 10:16 AM

शिक्का क्र. 3 ची वेळ : (कबुली) 01/06/2007 10:18 AM

शिक्का क्र. 4 ची वेळ : (ओळख) 01/06/2007 10:19 AM

दस्त नोंद केल्याचा दिनांक : 01/06/2007 10:19 AM

ओळख :

दुय्यम निबंधक यांच्या ओळखीचे इसम असे निवेदीत करतात की, ते दस्तऐवज करुन देणा-यांना व्यक्तीशः ओळखतात, व त्यांची ओळख पटवितात.

1) अ‍ॅड शरद निवृत्ती गायधनी ,घर/फ़्लॅट नं: 102/2

गल्ली/रस्ता: -

ईमारतीचे नावः -

ईमारत नं: -

पेठ/वसाहत: जि.न्या.आवार

शहर/गाव: नाशिक

तालुका: नाशिक

पिन: -

सह. निबंधकाची सही, नाशिक 1

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१.

पावती क्र.:5127 दिनांक:01/06/2007

पावतीचे वर्णन

नांव: श्री.शामकांत केशव कोतकर

30000 :नोंदणी फी

500 :नक्कल (अ. 11(1)), पृष्टांकनाची नक्कल (आ. 11(2)), रुजवात (अ. 12) व छायाचित्रण (अ. 13) -> एकत्रित फ़ी

30500: एकूण

दु. निबंधकाची सही, नाशिक 1

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१.

पुस्तक क्रमांक एक

........४९५०........ क्रमांक

वर नोंदला.

सह. दुय्यम निबंधक, वर्ग-२, नाशिक-१.

दिनांक १ माहे ६ /२००७

प्रमाणित करणेत येते की, या दस्तामध्ये एकुण ......२५ पाने आहेत.

सह. दुय्यम निबंधक, वर्ग-२, नाशिक-१.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-1 *

DSUMRY:054048SR104 Prepared on: 01/06/2007 10:19:42